[illegible]

**कायम विनाअनुदान (इंग्रजी माध्यम)**

[illegible]

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 16 JUN 2008

प्रति,

सचिव,
विघ्नहर ट्रस्ट निवृत्ती नगर (धालेवाडी) पो.शिरोली,
जुन्नर,जि.पुणे

विषय : २००५ - २००६ या शैक्षणिक वर्षात कायम विनाअनुदान तत्वावर नविन प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत . . .

संदर्भ :- १.शासन पत्र क्रमांक नप्राशा/१७०६/ ( ११४/२००६) ) प्राशि-३, दिनांक १६.५.२००६ व दिनांक ३१.५.२००६
२. या कार्यालयाचे पत्र क्रजा.क्र.प्रा/प्राशि-३/खाप्राशा/मान्यता पुवि/०६, दिनांक ७.६.२००६ व दिनांक १४.६.२००६
३. शासन पत्र क्रमांक नप्राशा /२००६(४५७/०६)दि.१८.७.२००६
४..या कार्यालयाचे पत्र क्रमांक शिऊसं/प्राशि -०१/पुवि /२००६ दिनांक २९.७.२००६
५.शासन पत्र क्रमांक न्यायाप्र/२००८/(१९२/०८) माशि-१, दि.१७.३.२००८

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरुन आपणांस कळविण्यांत येते की, खाली नमूद केलेल्या शैक्षणिक संस्थेस तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी सन २००५ - २००६ या शैक्षणिक वर्षापासून कायम विनाअनुदान तत्वावर नविन प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाच्या विचाराधीन आहे. असे उपरोक्त संदर्भिय पत्र क्रमांक २ नुसार कळविण्यांत आले होते.

तथापी संदर्भ क्रमांक ३ नुसार शासनाने म.रा.शि.महामंडळ यांनी उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर येथे दाखल केलेल्या याचिका क्रमांक २८१७/२००६ या याचिकेवर दिलेल्या निर्णयानुसार दिनांक १६.५.२००६ ते ३१.५.२००६ या कालावधीत दिलेले नविन प्राथमिक शाळा परवानगी आदेश रदद केले होते. त्यानुसार या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्रमांक ४ अन्वये शाळा परवानगीचे आदेश रदद झाल्याचे संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद यांचे मार्फत आपणांस कळविण्यांत आले होते आता उपरोक्त संदर्भिय पत्र क्रमांक ५ नुसार शासनाने दिनांक १६.५.२००६ ते ३१.५.२००६ या कालावधीतील परवानगी आदेश कायम राहतील असे कळविलेले आहे. त्यानुसार आपल्या शाळेस परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाच्या विचाराधीन आहे. आपण परवानगी मिळालेल्या ठिकाणी शाळा सुरु केली नसल्यास शासन निर्णय क्रमांक माशानु/२००७/(१००१/२००७) (३) माशि-१,दिनांक १९.१०.२००७ अन्वये आपणांस नुतनीकरणाने परवानगी शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून घेणेबाबत प्रस्ताव सादर करण्यांत यावा.

| अ.क्र. | शैक्षणिक संस्थेचे नांव | ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १. | विघ्नहर ट्रस्ट निवृत्ती नगर (धालेवाडी) पो.शिरोली, जुन्नर,जि.पुणे | निवृत्तीनगर (धालेवाडी) पो. शिरोली, जुन्नर, जि. पुणे | पहिली | इंग्रजी |

कायम विनाअनुदान

शिक्षण प्रमुख, मनपाशिमं ,प्रशासन अधिकारी मनपा/नपाशिमं, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद,यांना सदर संस्थेकडून खालील अटींची पूर्तता होते किंवा कसे याबाबत समक्ष भेट देऊन विहित नमून्यातील स्वयंस्पष्ट शिफारशीसह आपला अहवाल १५ दिवसांच्या आत या कार्यालयास सादर करणेबाबत कळविण्यांत येत आहे..

आपला अहवाल प्राप्त झालेनंतरच संबंधित संस्थांना शाळा परवानगी देणे/ न देणे याबाबतचे आदेश निर्गमित करण्यांत येतील.

१. संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी, किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.

२. संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

३. सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक / माध्यमिक शाळांपैकी एखादया शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४. संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रार आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५. संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

TRUE COPY
PRINCIPAL
Late Prof Ramkrushna More English Medium School Nivruttinagar

६. संस्थेने विहित नमून्यात सुधारित शुल्कासह अर्ज केला आहे व अर्जातील संस्थेचे नांव, शाळेचे ठिकाण यात तफावत नाही.

७. शासनाची मंजूरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

८. संस्था यथानियम शासन मान्यतेसाठी कागदपत्रांची पूर्तता तीन महिन्यात पूर्ण करेल.

९. संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहित केलेल्या शैक्षणिक शुल्क दरानुसार शुल्क आकारणे आवश्यक आहे.

१०. सक्षम अधिका-यांनी संबंधित संस्थांना मान्यता देतांना शाळेत सुरु असलेले वर्ग त्यातील विदयार्थी संख्येची प्रत्यक्ष तपासणी करुनच आपला अभिप्राय सादर करावा.व त्याआधारेच शाळेची परवानगी दिली जाईल.

११. सक्षम अधिका-यांच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडी संख्येपेक्षा जादा तुकडया संबंधित संस्था उघडणार नाही. असे संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टॅम्पपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.

१२. शासनाची परवानगी ज्या माध्यमासाठी देण्यांत आली आहे ते माध्यम वगळता अन्य माध्यमाच्या तुकडया संबंधित शाळा काढणार नाही. याबाबत देखिल संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टॅम्पपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.

१३. शासन निर्णय क्रमांक माशानु/२००७/(१००१/२००७) (३) माशि-१,दिनांक १९.१०.२००७ नुसार पुढील शैक्षणिक वर्षात (२००८-०९) शाळा सुरु न केल्यास यानंतर नुतनीकरणाच्या प्रस्तावाचा विचार केला जाणार नाही. व सदर शाळांचे परवानगी आदेश रददबातल होतील याची नोंद घ्यावी.

१४. संस्थेकडून रु. २०/- च्या कोर्टाच्या मुद्रांकित बंधपत्रावर संस्था कायमस्वरुपी विना अनुदान तत्वावर मराठी माध्यमाची प्राथमिक शाळा चालविण्यास तयार असून भविष्यकाळात शासनाकडे कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करणार नाही असे हमीपत्र संस्थेकडून लिहून घेणे आवश्यक आहे व याच्या छायांकित प्रती आपण आपल्या संबंधित नस्तीवर कायमस्वरुपी जतन करुन ठेवाव्यात.

१५. संस्थेने शाळेत नेमणूक केलेल्या शिक्षकांची माहिती सोबत देण्यांत यावी. (उदा:- नांव, जात, जन्मतारीख, नेमणूक दिनांक, शैक्षणिक पात्रता)

सदर संस्थेमार्फत शाळा सुरु करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावांच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही. सदरचे पत्र प्राप्त होताच वरील १ ते १५ विहित अटींची पूर्तता केली असल्याचे संस्थेने सात दिवसांचे आत आपल्या जिल्हाचे/मनपा/नपा चे शिक्षणाधिकारी (प्राथमिक ) जिल्हा परिषद, शिक्षण प्रमुख, महानगरपालिका शिक्षण मंडळ/ प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/ नगरपालिका शिक्षण मंडळ यांचे कार्यालयास आवश्यक त्या कागदपत्रासह/प्रमाणपत्रासह कळवावे. शाळा परवानगी दिलेल्या वर्षी शाळा सुरु केलेली नसल्यास सदर पत्र प्राप्त झाले पासून सात दिवसांचे आत शिक्षणाधिकारी (प्राथमिक ) जिल्हा परिषद, शिक्षण प्रमुख, महानगरपालिका शिक्षण मंडळ / प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/ नगरपालिका शिक्षण मंडळ व या कार्यालयास लेखी कळवावे.

(ना.बा.निकम )
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग,पुणे-१ करिता

स्थळप्रतिवर शि. उ. स
यांची सही असे

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी

१. शिक्षण प्रमुख, महानगरपालिका शिक्षण मंडळ, पुणे.

२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद,

३. प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/ नगरपालिका शिक्षण मंडळ,

२/-आपण सदर संस्थेच्या मूळ प्रस्तावावरुन सविस्तर पत्यावर वरिल शाळा परवानगी देण्याचे विचाराधीन असल्याचे आपले स्तरावरुनही तात्काळ कळविण्यांत यावे. मूळ प्रस्तावित परवानगीचे ठिकाण व माध्यम याबाबत खात्री करावी व वरिल अटींच्या संदर्भात आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची/प्रमाणपत्रांची तपासणी करुन प्रस्ताव तीन दिवसात आपल्या अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावा. शाळा प्रत्यक्ष सुरु नसल्यास तसे लेखी स्वरुपात या कार्यालयास सादर करावे.

प्रत : १. मा.सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, विस्तार भवन,मुंबई-३२.

२. मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना सविनय सादर

TRUE COPY
PRINCIPAL
Late Prof Ramkrushna More English Medium School,Nivruttinagar

TRUE COPY
PRINCIPAL
Late Prof Ramkrushna More English Medium School,Nivruttinagar

महाराष्ट्र शासन

**शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचे कार्यालय**

**१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे -१**

दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२५६९६ फॅक्स क्रमांक ०२०-२६१२२२१७

ई मेल आय.डी.क्र *dydpune@gmail.com* वेब साईट आयडी क्रमांक *www.dydepune.com*


जा.क्र.शिउसं/माध्य-१३/ /१६/पुवि/२०१६-१७/२०८६२ दि- २८/११/२०१६

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

जिल्हा परिषद,पुणे.

विषय :- **स्वयंअर्थ सहाय्यित शाळेस प्रथम मान्यता मिळणेबाबत.**

स्व.प्रा.रामकृष्ण मोरे इंग्लिश मेडीयम स्कूल. निवृत्तीनगर ता.जुन्नर जि.पुणे

संदर्भ :- १) शासन निर्णय एस.एफ.एस-१०१६/प्र.क्र./६९/एसएम-२दिनांक १७ जून २०१६

२) या कार्यालयाचे पत्र क्रं.शिउसं माध्य-३/१२/स्वंयअशाळा/मान्यता/पुवि/१६२९२/९५/ दिनांक १९-०७-२०१६

३)शिक्षणाधिकारी(माध्य.)जि.प. यांचे पत्र जा.क्र./कार्या-३/नमाशा/६०४१/१६,दि.२५/१०/२०१६

वरील संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की,माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१,३.२ व ३.३ अन्वये श्रीविघ्नहर **ट्रस्ट, निवृत्ती नगर शिरोली बू. ता.जुन्नर जि.पुणे संचलित** या माध्यमिक शाळेच्या **इयत्ता ९ वी १० वी (इ.नववी दहावीच्या प्रथम वर्गास)** सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षासाठी जुन २०१६ पासून एक वर्षासाठी आपली स्पष्ट शिफारस विचारात घेता प्रथम मान्यता देण्यात येत आहे..

१.प्रस्तुत प्रकरणी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ मधील तरतुदींचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

२ नविन वर्गांना कायम विना अनुदान तत्वावर प्रथम मान्यता देण्यात आली असून भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.

३.माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३(२),४८ तसेच ८३ मधील सर्व तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे

४. विहित निकषानुसार शिक्षक कर्मचारी यांची नियुक्ती करावी.

५.संचनिश्चिती व कर्मचारी मान्यता दरवर्षी करुन घेण्यात यावी.

६. शैक्षणिक शुल्क विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन आकारण्यात यावी.

७. विहित संख्येच्या मर्यादेत विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत.

८.शासनाचे वेळोवेळी दिलेले आदेश ,सूचना यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

९. सदरची प्रथम मान्यता ही तात्पुरत्या स्वरुपाची असून पाच वर्षांच्या कालावधीनंतर कायमपणे मान्यता देण्याचा या कार्यालयाकडून विचार करण्यात येईल.मात्र शाळेने,संस्थेने माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३ मध्ये घालून दिलेल्या शर्ती पूर्ण करणे चालू ठेवले पाहिजे.

१०.संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादींमध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.

११.शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणी व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

१२ अधिनियमातील तरतुदीनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून असेल

१३ शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गां व्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत

१४.परवानगी देण्यात आलेल्या नविन शाळा यांना शासनाच्या वेळावेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे ,कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वंय अथसहाय्यित शाळा (स्थापन व विनियमन) मुख्य अधिनियम २०१३ मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

TRUE COPY

PRINCIPAL

Late Prof Ramkrushna More English Medium School Nivruttinagar

TRUE COPY

CIPAL

Late Prof ... More English Medium School Nivruttinagar

17

१५ शाळा इमारतीच्या दर्शनीभागात सर्व जनतेच्या माहिती करिता **स्वंय अर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नविन शाळा /वर्ग असे** दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील

२४ महाराष्ट्र स्वंयअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन)अधिनियम २०१२ या आंनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळेचे भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

१७.महाराष्ट्र स्वंयअथसहय्यित शाळा (स्थापनाव विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना **U-Dise** मध्ये माहिती भरताना स्वंय अर्थसहाय्यित शाळा/वर्ग मळणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील

१८.शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

**इतर अटी :-**

जनहितार्थ याचिका क्रमांक ४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४.०४.२००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी.

१. शाळांमध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.

२.शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येवू नयेत.

३.शाळेच्या संबंधित कर्मचारी वृंद आणि इत्तर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे

४.सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building Code of India) अंतर्गत विहित केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देण्यापूर्वी करण्यात यावी व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांची राहील.

५. प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी.संबंधित अधिकारी यांनी त्याचे काटेकोरपणे पालन करावे.वरील काम जे अधिकारी/कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

६. **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९, महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ तसेच ज्या मंडळाशी शाळा संलग्नित होणार आहे त्या मंडळाने विहित केलेला निकष, शर्ती, अटी यांच्या पूर्ततेसह शाळास इमारत व भौतिक सुधारणा करणे बंधनकारक राहील.**

वरील निर्धारीत केलेल्या शर्तीचे व वेळोवेळी निर्धारीत करण्यात येतील अशा शर्तीची पूर्तता करणेच्या अधिन राहून आणि समाधानकारक कामकाजाच्या अधिन राहून शाळेची मान्यता चालू ठेवता येईल.परंतु प्रतिसाद न मिळालेस शाळेची मान्यता काढून घेतली जाईल याची नोंद घ्यावी.शिक्षणाधिकारी यांनी पुढील तपासणीचे वेळी शाळेची प्रगती विचारात घेऊन मान्यता पुढे चालू ठेवणेबाबत विचार करावा.

(दिनकर टेमकर)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे-१

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,**

१. मुख्याध्यापक, स्व.प्रा.रामकृष्ण मोरे इंग्लिश मेडीयम स्कूल. निवृत्तीनगर ता.जुन्नर जि.पुणे

२. विभागीय सचिव, पुणे विभागीय शिक्षण मंडळ, शिवाजीनगर, पुणे.

३. अध्यक्ष/ सचिव श्रीविघ्नहर ट्रस्ट, निवृत्ती नगर शिरोली बू. ता.जुन्नर जि.पुणे

**माहितीसाठी सादर,**

१. निवडनस्ती.

TRUE COPY
PRINCIPAL
Late Prof Ramkrushna More English
Medium School Nivruttinagar

TRUE COPY
PRINCIPAL
Late Prof Ramkrushna More English
Medium School Nivruttinagar